# न थांबणारे शब्द

ॲड. अरुण गोविंद देशमुख

Scanned by CamScanner

## मनोगत

न संपणारे शब्द...हा माझा पहिला कविता संग्रह आहे.

साधारण १९८२पासून मी कविता करू लागलो. महर्षी दयानंद महाविद्यालयात माझ्या या प्रयत्नांना खऱ्या अर्थाने आकार दिला तो त्यावेळचे आमचे मराठी विभागाचे प्रमुख श्री. केशव मेश्राम यांनी. सातत्याने मराठी विभागात काम केल्याने जरी कॉमर्सचा विद्यार्थी असलो तरी संपादक म्हणून मला निवडले जायचे. कॉलेजमध्ये भित्ती पत्रके तयार करून ती सातत्याने नवीनरित्या प्रसिद्धी करीत होतो. याच दरम्यान अनेक कविता मी केल्या. मात्र त्यानंतर कविता लिखाणात सातत्य राहिले नाही. अर्थात ज्या वेळेस कविता करण्याबाबत स्फूरायचे त्यावेळेस मी त्या करायला लागलो. अशा दोन दोन महिन्यानंतर केलेल्या काही कविता तर ट्रेनच्या तिकीटापासून कुठल्याही चिठोऱ्यावर लिहिलेल्या आहेत.

दयानंदाईट ह्या कॉलेजच्या वार्षिका मध्ये माझ्या कविता ह्या नेहमीच असायच्या. अर्थात केलेल्या कविता मी कुठेही प्रसिद्ध करण्याचा विशेष प्रयत्न केला नसल्याने ह्या छंदाची फार कमी जणांना माहिती होती. सदर निवडक कवितेत सर्व प्रकारच्या कविता मी घेतलेल्या आहेत मात्र प्रामुख्याने कवितेत आढळतो तो प्रेम हा विषय. ज्यांच्यामुळे ह्या कविता स्फूरल्या त्यांना खऱ्या अर्थाने हे काव्य पुष्प समर्पित आहे. मला नेहमीच प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या आईचे या पुस्तकाद्वारे मी ऋण व्यक्त करीत आहे. हे पुस्तकाचे मुद्रणदोष श्री. अरविंद कर्वे यांनी पाहिलेले आहे. सदर काव्य पुस्तकाचे परिक्षण प्रसिद्ध लेखिका शिरीष पै यांनी केलेले असून या सर्वजणांचे मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांचेमुळे माझा हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होत असल्याने त्यांच्या ह्या पाठींब्यामुळेच मला ही साहित्यसेवा अखंडीत चालू ठेवता येत आहे हे मी सविनय सांगत असून त्यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

हरि ओम...

ॲड. अरुण गोविंद देशमुख



Scanned by CamScanner

## मनोगत

ही दिलखुलास कविता...

श्री. अरुण देशमुख ह्यांची कविता वाचताना प्रामुख्याने हे जाणवले की त्यांच्या कवितेला पारंपरिक मराठी कवितेचे नियम न लावता त्या वाचायला हव्यात. कारण मराठी काव्यपरंपरेच्या संस्कारात त्यांची कविता वाढलेली नाही. स्वतःचे अंतर्मन उलगडून दाखवण्यासाठी कविता हाच वाङ्मयप्रकार त्यांना सोईस्कर वाटला असावा. कविता हा वाङ्मयप्रकार तसा वरवर पाहता सरळ, साधा, सोपा, थोडक्यात सर्व सांगून जाणारा आहे. तो वाङ्मयप्रकार आपलासा करणाऱ्या कवीपाशी अभ्यासपूर्वक जोपासलेली काव्यशैली कवीपाशी असायलाच हवी असे नाही. कवीचे संवेदनाक्षम मनही कविता रचायला पुरेसे आहे. वृत्त, छंद, ताल, मात्रा, लय ह्यांची अशा कवीला फारशी गरज नसते. आपली सुखदुःखे आपल्या मनाच्या तालावर आपल्याच भाषेत तो प्रगट स्वगतासारखी बोलून दाखवतो. अशा कवीची कविता म्हणजे त्याच्याच तऱ्हेने उच्चारलेले युक्त उद्‌गार. रूढ काव्यपरंपरेशी त्याच्या कवितेचे नाते असेलच असे नाही.

त्या दृष्टीने विचार करता मला कवी अरुण देशमुखांच्या कवितेचे एक वैशिष्ट्य प्रथमतःच जाणवले, ते म्हणजे त्यांच्या कवितेतील भावनेंची शुद्धता. अतिशय प्रामाणिकपणे कवीने आपल्या जीवनानुभूतीविषयीच्या प्रतिक्रिया आपल्या पद्धतीने उघड केल्या आहेत. उदाहरणार्थ-

"कुणाकरिता असेच आता जीवन रेटायचे
राहिलंच नाही मन आता, कुठेतरी संपवावयाचे
क्षणं निष्ठुर जीवनाचे, काय ठेवलंय जगून
नाव पैसे कमवायचे, गमवायचे मरून
नाही जीवनात गोडी, नाही विश्वासू साथीदार
नशिबास केलेल्या आरोपाचा देवच साक्षीदार"

जीवनाच्या अनुभवात जी काही सुखदुःखे कवीने भोगली त्याचे मनमोकळे चित्रण कवि वरीलप्रमाणे सरळपणे, स्पष्टपणे करून जातो किंवा पुढील कविता-

"रविकिरणांनी उजळून गेलो
निसर्गात मी मिसळून गेलो
मातीच्या गंधात हुरळून गेलो



Scanned by CamScanner

आसमंतात मी बहरून गेलो
आज मातीत समरसून गेलो''.

कुठल्याही व्यक्तीच्या जीवनात आशा निराशेचे जे अनंत खेळ चालू असतात त्याचे वद्य चित्रण कवी आपल्या कवितेत करतो. कधी जीवनातील निराशेने काळवंडून जातो तर कधी जगण्याच्या उमेदीने बहरून जातो. असे जीवनाचे दोन्ही टोकांचे रंग कवीच्या कवितेत आपल्याला जाणवतात.

कवीच्या बहुसंख्य कवितांचा विषय 'प्रेम' हा आहे आणि ते प्रेमही चिरवियुक्ताचेच आहे. कुणासाठी तरी स्वप्ने पाहायची, अपेक्षा बाळगून फुलत राहायचे आणि शेवटी अव्हेराच्या वेदनेने कोमेजून जायचे अशी बहुतेक कवितेतील प्रियकराची मनःस्थिती दिसते.

''का गुंतलीस एका जीवनी
स्वप्नेच फक्त दिलीस
अन् स्वप्नांशिवाय दुसरे काहीही
घेण्यास अवघडलीस''

प्रेम ही एक सुंदर भावना असली तरी प्रेमात मीलन हे सहसा दुर्मीळच असते, अशी कवीची भावना आहे. प्रियकर प्रेयसीला एकमेकांबद्दल कितीही ओढ असली तरी काही ना काही कारणामुळे, कदाचित् कदाचित् गैरसमजामुळे, परिस्थितीमुळे, कदाचित् त्यातील कुणाच्यातरी कठोरपणामुळे दोघांच्याही नशिबी शेवटी दुरावाच लिहिलेला असतो.

'थंड गुलाब' ही कविता ह्या भावनेची प्रतीक अशीच कविता गणावी लागेल. ह्या कवितेची पहिलीच ओळ-

''किती थंड आहे ना, हा लाल गुलाब
त्याच्या प्रत्येक पाकळीत माझे हृदयच वसले आहे''

खूप काही बोलून जाते, सांगून जाते. एक ना दोन, अनेक प्रेमकवितातून कवीने जणू प्रेमभंगाचीच एक करुण कहाणी अखंडपणे सांगितली आहे.

इतर अनेक विषयही कवीला वावडे नाहीत. '५००च्या नोटेवर गांधीजी' सारख्या कवितातून सामाजिक परिस्थितीचा उपहास केला आहे. तर 'रम्य पहाट' सारख्या कवितेतून कवीला वाटणारी निसर्गाची ओढ व्यक्त झाली आहे.

विविध विषयांवर कवीने कविता केल्या असल्या तरी मनात



Scanned by CamScanner

गुंजत राहते ती कवीची हळुवार प्रेमकविता. काहीशी करुण, काहीशी हतबल-पण उदात्त स्वभावाची.

''माझ्या नशिबात नव्हतीस तू
चूक तुझी नव्हतीच
दैवाने जवळ आणली तुला
माझी कधीच नव्हतीस

आता फक्त जपावे क्षण
ती स्वप्नं अंन् रम्यता
आणि समोर येता हसून
दाखवायची ती सभ्यता''

श्री. अरुण देशमुख ह्यांच्या कवितेतील दिलखुलास मोकळेपणाचा, उच्च भावनेचा आणि जीवनातल्या सुंदरतेवरील प्रेमाचा मी मन:पूर्वक गौरव करते.

**शिरीष पै**



Scanned by CamScanner

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | कळी ओठांची | ९ |
| २) | ५००च्या नोटेवर गांधीजी | १० |
| ३) | अविश्वास /मनात | ११ |
| ४) | चारा खाणार नाही | १२ |
| ५) | माझ्या प्रिय घरी/ओढ | १३ |
| ६) | रम्य पहाटे | १४ |
| ७) | अजुनी उत्साहात/हिरव्या पानांमधून | १५ |
| ८) | आजच मरावे | १६ |
| ९) | देवाज्ञा/एकटं | १७ |
| १०) | आले आले पाणी | १८ |
| ११) | सेवा जीवनाला/मानलेली बहीण | १९ |
| १२) | वादळ/गोल टोपी | २० |
| १३) | फक्त स्वप्नेच/ब्रह्मचार्यात | २१ |
| १४) | दिलासा | २२ |
| १५) | पुन्हा जेव्हा भेटलीस | २३ |
| १६) | प्रेम (स्फूट काव्य-१)/प्रेम (स्फूट काव्य-२) | २४ |
| १७) | वेडी वाट/नेता एकच पाहिजे | २५ |
| १८) | भरकटलेला | २६ |
| १९) | डोकावून पाहिलं/होती वाचली कविता | २७ |
| २०) | ती जखम | २८ |
| २१) | दोन क्षणांची | २९ |
| २२) | गजानना | ३० |
| २३) | पाहण्याला/ती आली अचानक | ३१ |
| २४) | एक बिचारा | ३२ |
| २५) | गर्विष्ठ झाड/जुने गळून पडता | ३३ |
| २६) | खोटे मूर्तिकार/गर्दीतला ठिपका | ३४ |
| २७) | मैत्रीणच वाटली बरी | ३५ |
| २८) | पंखाची सावली | ३६ |
| २९) | ओसाड भूकंपा गावी | ३७ |
| ३०) | फसले दान आयुष्याचे/गर फणसाचेच आहे ना | ३८ |
| ३१) | हसरी | ३९ |
| ३२) | ओलेती/ह्या कळ्या नाजूकल्या | ४० |
| ३३) | हरिनामाचा गजर | ४१ |
| ३४) | काल आणि आज/प्रेमाची व्याख्या | ४२ |
| ३५) | देशासाठी | ४३ |
| ३६) | अजुनी तुला पहायला/नवीन वारे | ४४ |
| ३७) | स्वप्नात/चुंबन | ४५ |
| ३८) | थंड गुलाब | ४६ |
| ३९) | प्रेम | ४७ |
| ४०) | स्वप्नांशिवाय | ४८ |




Scanned by CamScanner



## कळी ओठांची

कळी ओठांची हलली
हलत हलत फुलली
फुलून ती हसली
मजला ती ली

ये ना,
का लांब बसलास?
का खोटेच हसलास?
कळीवर रूसलास...
का नाही फसलास?

मधेच सांगताना ती थांबली
पाकळी पापणीची फडफडली
मधेच ती लवली
भाषा तिची कळली



Scanned by CamScanner



## ५००च्या नोटेवर गांधीजी...

जेव्हा ५००च्या नोटेवर गांधींना छापले
तेव्हांच खरे आम्हाला गांधीजी समजले...

आतापर्यंत कोर्टातंल्या भिंतीवरचे गांधी,
शहरातील महत्त्वाच्या रस्त्याचे नाव ''एम.जी'' व
इतिहासाच्या पुस्तकात भारताच्या स्वातंत्र्य लढाईतले
गांधी तेवढेच आम्हांला माहीत होते

देशातील एवढ्या क्रांतिकारी, महान नेत्यांतून
गांधींनाच का बरे निवडले?
ज्यांनी आयुष्यात कपडे अव्हेरले
घामाचे पैसे केले, त्यांचे नाव नोटे ऐवजी घेतले जावे...!!
गंमत वाटली

५ गांधींची साडी, कोट वा इतर गोष्टी मिळतात म्हणे !
गुंडही गांधींच्या, भाषेत बोलू लागले !! हे काय कमी
कौतुकाचे आहे? पूर्वी पेट्या, सुटकेसची भाषा होती
आता गांधींची भाषा बोलली जाते
''१०० गांधी पाठवा मुलाला सोडतो,
१००० गांधीत त्याला खपवतो!!''

नेत्यालाही मग गांधी टोपी ऐवजी,
गांधी नोट जास्त जवळची वाटू लागली
कदाचित टोपीवरचा विश्वास उडाला म्हणूनच की काय
गांधींना त्यांनी नोटेवरच छापले

१० वर्षापूर्वी कोर्टात-भिंतीवरचे नेते होते गांधी. अजून
१० वर्षानंतर लहान मुलाला विचारता महात्मा गांधी कोण होते?
उत्तर येईल ''५००च्या नोटेवर छापलेल्या माणसाला
गांधी असे म्हणतात!!''



Scanned by CamScanner

## अविश्वास

वाटे दिव्यांची माळही गळी
वाटे लाटांची आसवे नयनी...
वाटे बसलो उगाच तीरी
वाटे साद येईल अजुनी...

वाटे थव्यांचा पदर शीरी
वाटे सूर्य कुमकूम मधूनी
वाटे बघता स्वप्न मनी
वाटे स्वप्नात माझीच अजुनी...

वाटे सांज आली नशिबी
वाटे रात्र दिसली दुरूनी
वाटे जरी माझी हृदयी
वाटे अविश्वास तूज अजुनी...



## 'मनात'

मनात माझ्या तू बसलीस
हळूच खुदकन का हसलीस?

मनात शिरून, तेथेच वसून
स्वतःच हरवून, का भुललीस?

अंगणाचा गुलमोहर, मनी बहरला
स्वतःवर उगाच, का रूसलीस?

कॉलेजातील कोपरे, चोरटे हसरे
गोड हसून का फसलीस?



Scanned by CamScanner



## ''चारा'' खाणार नाही

आईशपथ खरे सांगेन
खोटं सांगणार नाही
कपडे काढल्याशिवाय
काम जमणार नाही...

नागडं उघडं काम करताना
काही दडवणार नाही
खिसाच नसेल अंगावरती
पैका दडवणार नाही...

एका कामास डोकी बारा
काहीच होणार नाही
डोळ्यांची झुंज लागल्यावर
डोकीच राहणार नाही...

हुकूमशाहीत कामे होतात
विचारास थाराच नाही
लोकशाहीत प्रश्नच प्रश्न
कामेच होणार नाही...

जोडे चार मारता दोघांना
भ्रष्टाचार होणार नाही
कामाची मजा चाखताना
''चारा'' खाणार नाही...!!



Scanned by CamScanner